**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सुनिल देवीदास झाड
१२७, रविवार पेठ, जिल्हा, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हाधिकारी, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६७८ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १६.४.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुनिल देवीदास झाड
१२७, रविवार पेठ, जिल्हा, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हाधिकारी, पुणे प्रतिनिधी श्रीमती सीमा होळकर

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, पुणे श्री.रा.वि.निंबाळकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ६.११.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०.११.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७.१२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २.१.२००७ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>दि.१.१०.२००६ ते ३१.१०.२००६ या काळात किती व्यक्तींनी परमिटसाठी (खरेदी, वाहून नेणे इ.)अर्ज केले. मद्यप्राशन परवान्याबाबत संपूर्ण महाराष्ट्रासाठी एक नियम व फक्त वर्धा जिल्ह्यासाठी वेगळा नियम असे का आहे. |
|---|---|

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.११.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

मद्यप्राशन परवान्याबाबत महाराष्ट्र राज्यातील इतर जिल्ह्यांना एक नियम व फक्त वर्धा जिल्ह्यासाठी वेगळा नियम का? अशी विचारणा आपण केली असता आपल्या अखत्यारीत माहिती नाही, असे उत्तर जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, पुणे यांनी दिले. अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे अपील केले असता त्यांनी अपील फेटाळले व राज्य शासनाकडे माहिती मागावी, असे सांगितले. नियमातील फरकामुळे शासन फक्त वर्धा जिल्ह्यातील नागरिकांच्या आरोग्याचा विचार करुन इतर नागरिकांचा विचार न करता भेदभाव करीत आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.सुनिल देवीदास झाड यांनी केले.

श्री.झाड यांना माहिती देण्यात आली. तसेच संबंधित नियम राज्य विधी मंडळाने पारित केले असून शासनाच्या धोरणाचा भाग आहे. तो आपल्या कार्यालयाच्या अखत्यारीत नसल्यामुळे व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये भाष्य करणे अपेक्षित नसल्याचे श्री.झाड यांना कळविले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री.अे.डी.निरभवणे व अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.सी.डी.जोशी यांनी केले, ते रास्त आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२५.१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.संभाजी दत्तात्रय दिवेकर
मु.पा.वरवंड, ता.दौंड, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, दौंड
दौंड तहसील कार्यालय, ता.दौंड, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, दौंड
दौंड तहसील कार्यालय, ता.दौंड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६९५ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७ . ११ .२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.संभाजी दत्तात्रय दिवेकर
मु.पा.वरवंड, ता.दौंड, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, दौंड
दौंड तहसील कार्यालय, ता.दौंड, जि.पुणे श्री.प्रशांत आवटे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, दौंड
दौंड तहसील कार्यालय, ता.दौंड, जि.पुणे श्री.निलप्रसाद चव्हाण

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ९.१२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४.१.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २३.१.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८.२.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>मंडल अधिकारी कार्यालय, पाटस यांच्याकडे दि.१६.११.२००६ रोजी दिलेल्या नकाशाची व जबाबाची नक्कल. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.११.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे दि.२७.११.२००८ रोजी अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

मंडल अधिकारी, पाटस यांच्याकडे आपण दिलेल्या जबाबाची नक्कल १३ दिवस उशिरा मिळाली, म्हणून जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, दौंड यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.संभाजी दत्तात्रय दिवेकर यानी केली. श्री.दिवेकर यांनी दि.१३.१२.२००६ रोजी अर्ज केला होता. दि.४.१२.२००६ ते दि.१७.१.२००७ या कालावधीत आपण 'यशदा'तर्फे आयोजित केलेल्या पायाभूत प्रशासनास गेलो होतो. दि.१८.१.२००७ रोजी आपण मंडल अधिकारी, पाटस यांच्याकडून नक्कल प्राप्त करुन घेतली व दि.२४.१.२००७ रोजी टपालाने श्री.दिवेकर यांना माहिती पाठविली यात आपला माहिती नाकारण्याचा अथवा लपविण्याचा कोणताही उद्देश नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, दौंड श्री.निलप्रसाद चव्हाण यांनी पूरक कागदपत्रांसह केले. मंडल अधिकारी, पाटस यांच्याकडे श्री.दिवेकर यांनी दि.१७.११.२००६ रोजी जबाबाच्या नकलांच्या मागणीसाठी अर्ज केला होता. मंडल अधिकाऱ्यांनी दि.६.१२.२००६ रोजी कोतवालामार्फत त्यांना लेखी उत्तर पाठविले आहे, असेही त्यांनी नमूद केले. श्री.दिवेकर यांनी केलेल्या मूळ अर्जात कोणत्या प्रकारच्या व

कोणत्या प्रकरणातील नकला हव्या आहेत, हे नेमकेपणाने नमूद केलेले नाही, असे निवेदन जन माहिती अधिकारी श्री.निलप्रसाद चव्हाण यांनी केले.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २२.१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.मधुकर नारायण कान्टे
१६३/२, शुक्रवार पेठ, (केवटे बिल्डिंग तिसरा मजला पूर्व), पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, भोर
भोर तहसील कार्यालय, ता.भोर, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
भोर तहसील कार्यालय, ता.भोर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६९६ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७.११.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मधुकर नारायण कान्टे
१६३/२, शुक्रवार पेठ, (केवटे बिल्डिंग तिसरा मजला पूर्व), पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, भोर
भोर तहसील कार्यालय, ता.भोर, जि.पुणे श्री.सचिन इथापे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
भोर तहसील कार्यालय, ता.भोर, जि.पुणे श्री.फिरोज शेख

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २.१२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३०.१२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ५.२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>वेल्हे ते नसरापूर पूर्वी रसत्याचे संपादनाबाबत मौजे कोळवडी, ता.भोर स.नं.२८ पैकी दि.५.१२.१९५९ रोजीच्या फाळणीबारा, फेरफार नोंद क्र.१७६ संदर्भिय (सुमारे ६० वर्षापूर्वी) | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.११.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

वडिलार्जित जमिनीतून पूर्वी रस्ता गेल्यामुळे संपादित केलेल्या जमिनीवर तशी नोंद करण्याच्या संदर्भात अपीलकर्ता श्री.मधुकर नारायण कान्टे यांनी माहिती मागितली होती. त्यांच्या मागणीनुसार नोंद नसल्यामुळे मिळकतीस अंमल देता येत नाही, असे त्यांना कळविण्यात आले. तत्कालीन अधिकाऱ्यांनी चुकीच्या नोंदी केल्यामुळे आपल्यावर अन्याय होत आहे, असे श्री.कान्टे यांचे म्हणणे आहे. याबाबत १५ दिवसांच्या मुदतीत पुढील कार्यवाही करावी, असे दि.११.६.२००८ -च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त ठरले होते. त्याप्रमाणे दि.२२.७.२००८ रोजी तहसीलदारानी दिलेल्या पत्रानुसार आपण मोजणीशुल्क भरले असतानाही पुढील कारवाई झालेली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.कान्टे यांनी केली. जमिनीबाबतचे सदर प्रकरण अप्पर जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे निर्णयात पुराव्यासाठी असल्याचेही त्यांनी नमूद केले.

जमीन संपादन सुमारे ६० वर्षांपूर्वी झाली आहे. तेव्हा चुकीच्या नोंदी झाल्या, अशी अपीलकर्त्याची तक्रार आहे. महितीच्या अधिकारात त्यांना सर्व माहिती देण्यात आली असून

जमिनीची मोजणी होण्याच्या प्रशासकीय कार्यवाहीच्या दृष्टीकोनातूनही आपण कृती केली आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, भोर श्री.सचिन इथापे यांनी केले. तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, भोर तालुका, जि.पुणे यांच्याकडून लवकरात लवकर मोजणी होण्यासाठी आपण प्रयत्न करु, असेही त्यांनी नमूद केले.

संदर्भित विषय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य करण्यात येत आहे.

(२) जमीन मोजणीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, भोर व तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, भोर तालुका, जि.पुणे यांनी आयोगास सादर करावा व त्याची प्रत अपीलकर्त्यास द्यावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२०.१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.आत्माराम रामचंद्र शेवाळे
मु.पो.येवती, ता.कराड, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती कराड, ता.कराड, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत येवती, ता.कराड, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७० / सातारा /२००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.आत्माराम रामचंद्र शेवाळे
मु.पो.येवती, ता.कराड, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती कराड, ता.कराड, जि.सातारा प्रतिनिधी श्री.आर.एस.दळवी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत येवती, ता.कराड, जि.सातारा श्री.विश्वास बाबा सागरे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५.५.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २.६.२००६ व १४.९.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९.६.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १८.१०.२००६ व ३१.१०.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

गावाच्या जोडरस्त्यावर खाजगी व्यक्तीने अतिक्रमण करुन तो बळकावला, त्याबाबत आपण मागितलेली माहिती श्री.विश्वास बाबा सागरे जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत येवती, ता.कराड यांनी देण्यात टाळाटाळ केली, योग्य मुदतीत माहिती दिली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कराड यांच्याकडे अपील केल्यानंतर कागदपत्रे दिली. हीच कागदपत्रे सापडत नसल्याचे आधी ग्रामसेवकांनी कळविले होते. दिलेली कागदपत्रे ही विश्वासार्ह नाहीत. श्री.आनंदा बोरगावकर यांनी ही जमीन खरेदी केल्याचे रजिस्टर्ड खरेदीपत्र आपण मागितले होते. ग्रामसेवकांनी स्टॅम्प पेपरवरील खरेदीपत्र दिले. त्यात दाखविलेल्या चतु:सीमा व क्षेत्रफळ चुकीचे आहे. ग्रामपंचायतीतील सत्ताधीशांनी व सरपंचांनी ग्रामसेवक श्री.बी.बी.सागरे यांना हाताशी धरुन गावाचा चौक व रस्ता खाजगी व्यक्तीच्या नावे देण्याचा भ्रष्टाचार केला आहे. त्याबाबत चौकशी व्हावी. गावाचा जोडरस्ता कळावा, तसेच गावठाण चौक शोधून तो गावाला मिळावा, अशी मागणी अपीलकर्ता श्री.आत्माराम रामचंद्र शेवाळे यांनी केली.

श्री.शेवाळे यांनी केलेल्या अर्जावर विहित मुदतीत उत्तर दिले. मागितलेली माहिती फार जुनी असून ग्रामपंचायतीच्या लेखा तपासणीनुसार दप्तर वेगळे ठेवले होते. त्यात संबंधित कागदपत्रे आढळली नाहीत. शोध सुरू असून माहिती उपलब्ध होताच दिली जाईल, असे श्री.शेवाळे यांना कळविले होते. सन १९७५ मधील माहिती असल्यामुळे शोधण्यास वेळ लागला. खरेदीखताची मूळ

प्रत खरेदी-मालकाकडून मागविली, त्यांनी ती विलंबाने दिली. त्यानंतर कागदपत्रांच्या प्रती दिल्या असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री.विश्वास बाबा सागरे यानी केले. गटविकास अधिकारी यांनी अपिलाचा निर्णय दिला नाही, अशी तक्रार श्री.शेवाळे यांनी केली. मात्र श्री.शेवाळे यांच्या अपिलाची दखल घेऊन माहिती देण्याबाबतची कार्यवाही केली, असे प्रतिपादन गटविकास अधिकारी यांच्या वतीने त्यांचे प्रतिनिधी श्री.आर.एस.दळवी यांनी केले.

श्री.शेवाळे यांनी मागितलेली माहिती सार्वजनिक हिताची व सार्वजनिक कारभारातील पारदर्शकतेच्या दृष्टीने महत्त्वाची अशी आहे. प्रशासकीय कार्यवाहीची मागणी श्री.शेवाळे यांनी प्रामुख्याने केली असली तरी माहितीची शहानिशा होण्याच्या दृष्टीने ती महत्त्वाची आहे, ही लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशत: मान्य.

(२) येवती, ता.कराड (सातारा) येथील विषयांकित जोडरस्ता व गावठाण चौक याबाबत अपीलकर्ता श्री.आत्माराम रामचंद्र शेवाळे यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांच्या अनुषंगाने वस्तुस्थितीची शहानिशा करुन सर्व मुद्दयांबाबत स्पष्टीकरण करणारा अहवाल गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कराड यांनी १५ दिवसांत आयोगाला सादर करावा व त्याची एक प्रत अपीलकर्त्यास द्यावी.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३१.१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रदिप गोपाळ बडवे
सद्‌गुरुनगर पाटस रोड, बारामती, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, माळशिरस,
माळशिरस तहसील कार्यालय, ता.माळशिरस, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, माळशिरस,
माळशिरस तहसील कार्यालय, ता.माळशिरस, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७०० / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.११.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, माळशिरस,
माळशिरस तहसील कार्यालय, ता.माळशिरस, जि.सोलापूर श्री.वैभव नावडकर

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, माळशिरस,
माळशिरस तहसील कार्यालय, ता.माळशिरस, जि.सोलापूर श्री.श्रीकांत पोरे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २७.११.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३०.१२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३.१.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २०.४.२००७ |

| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती |
|---|---|
| | सन २००५-२००६ ची देवस्थान कॅश अलौन्सची रक्कम व मौजे गुरसाळे, ता.माळशिरस येथील जुने स.नं.९५/१ व ९६/४, ९७/४ चे सन १९६३-६४ ते १९६६-६७ अखेरपर्यंतचे ७/१२ उतारे. माहिती वेळेत का दिली याबाबत खुलासा व प्रत्येकवेळी माहिती अधिकारात फॉर्म भरुन पाठवावा लागतो काय याबाबतचा खुलासा. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.११.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी गैरहजर राहिल्यामुळे दि.२७.११.२००८ रोजी अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

देवस्थान कॅश अलौन्सची रक्कम व जमिनीचे सन १९६३-६४ ते १९६६-१९६९ या वर्षातील ७/१२ उतारा मिळण्यासाठी दोन अर्ज आपण केले होते. विहित मुदतीत त्यावर कार्यवाही झाली नाही. देवस्थान कॅश अलौन्सची रक्कम काढण्याचे काम झाले आहे व उतारे तयार आहेत, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार यांनी मुदत संपल्यानंतर बऱ्याच दिवसानंतर कळविले. अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, माळशिरस यांनी अपील फेटाळले. आपला अर्ज दि.२७.११.२००६ चा होता व उत्तर दि.३०.१२.२००६ रोजी पाठविले आणि प्रत्यक्षात दि.१२.२.२००७ रोजी माहिती पाठविली. जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.प्रदीप गोपाळ बडवे यांनी अपील अर्जात व विविध निवेदनाद्वारे राज्य माहिती आयोगाकडे केली आहे.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, माळशिरस यांच्याकडे मतदार याद्यांचे पुनर्निरीक्षण आदींसह तीन अतिरिक्त पदांचे कायभार होते, त्यामुळे उत्तर देण्यास विलंब झाला. तसेच देवस्थान कॅश अलौन्सची रक्कम काढण्याचे काम चालू होते. तसे श्री.बडवे यांना कळविण्यात आले. दि.३०.१२.२००६ रोजी शुल्काबाबतचे पत्र पाठविले, त्यांनी

दि.७.२.२००७ रोजी शुल्क भरल्यानंतर त्यांना ७/१२ चे उतारे देण्यात आले. देवस्थान कॅश अलौन्सची रक्कम दि.२८.३.२००७ रोजी त्यांना मनीऑर्डरने पाठविण्यात आली. या दोन्हींची शहानिशा प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी करण्यात येऊन अपील फेटाळण्यात आले, असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, माळशिरस श्री.वैभव नावडकर यांनी नमूद केले. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार श्री.अतुल म्हेत्रे यांनी केलेली कार्यवाही व त्यांच्याकडील अतिरिक्त पदांचा कार्यभार लक्षात घेता विलंब क्षमापित करावा, अशी विनंती विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.श्रीकांत पोरे व अपिलीय प्राधिकारी श्री.वैभव नावडकर यांनी लेखी व तोंडी केली. मात्र प्रतीवर्षी देवस्थान कॅश अलौन्सची रक्कम मिळण्यासाठी आपल्याला बराच त्रास सोसावा लागतो, निवासी नायब तहसीलदारांकडे प्रत्येक कामासाठी स्वतंत्र लिपीक असतात. त्यानुसार रक्कम काढण्याचे व ७/१२ उतारा काढण्याचे काम वेळेवर केलेले नाही, असे निवेदन श्री.बडवे यांनी दि.१.९.२००८ च्या पत्रान्वये केले. तथापि जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचा खुलासा व रक्कम देण्याची प्रशासकीय कार्यवाहीची मागणी याचा विचार करता दंडात्मक कारवाईची मागणी अमान्य करण्यात येत आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २१.१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

ॲड.विजय शंकर मारटकर
९६१, बुधवार पेठ, पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** विक्रीकर सहआयुक्त (व्यवसायकर), पुणे क्षेत्र,
विक्रीकर भवन ३ रा मजला, येरवडा, पुणे-६ **उत्तरवादी**
**जन माहिती अधिकारी** तथा विक्रीकर अधिकारी (व्यवसायकर),
पुणे क्षेत्र, विक्रीकर भवन ३ रा मजला, येरवडा, पुणे-६

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७२०/२००९/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.०१.१०.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** ॲड.विजय शंकर मारटकर
९६१, बुधवार पेठ, पुणे

**अपिलीय प्राधिकारी तथा** विक्रीकर सहआयुक्त (व्यवसायकर), पुणे क्षेत्र,
विक्रीकर भवन ३ रा मजला, येरवडा, पुणे-६ श्री.स.मा.भंडारे

**जन माहिती अधिकारी** तथा विक्रीकर अधिकारी (व्यवसायकर)
पुणे क्षेत्र, विक्रीकर भवन ३ रा मजला, येरवडा, पुणे-६ श्री.य.गो.महाले

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२२.१०.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२७.११.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.०३.०१.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०४.०३.२००९ |

| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती<br><br>श्री.डी.के.चन्ने यांचे बाबतीत सन १९९९ ते २००६ कालावधीची पगार पत्रकाची, फॉर्म १६, भविष्य निर्वाह निधीमधून काढलेल्या वेगवेगळ्या रकमांची माहिती |
|---|---|

## विवेचन

आपण मागितलेली माहिती शासकीय सेवकाला मिळणाऱ्या आर्थिक लाभाच्या संदर्भातील आहे, तरी ती वैयक्तिक स्वरूपाची, त्रयस्थ पक्षाची असून त्रयस्थ पक्षाने हरकत घेतल्यामुळे देता येत नसल्याचा निर्णय जन माहिती अधिकारी तथा विक्रीकर अधिकारी (व्यवसाय कर), पुणे क्षेत्र, विक्रीकर भवन, तिसरा मजला, येरवडा, पुणे-६ व अपिलीय प्राधिकारी तथा विक्रीकर सहआयुक्त (व्यवसाय कर), पुणे क्षेत्र, विक्रीकर भवन, तिसरा मजला, येरवडा, पुणे-६ यांनी दिला आहे, तो अयोग्य आहे. संबंधित माहिती न्यायालयातील एका व्यक्तिगत दाव्याच्या संदर्भात आपल्याला हवी आहे. ती आपल्याला मिळावी, असे प्रतिपादन अपीलकर्ता ॲड.विजय शंकर मारटकर यांनी केले.

अपीलकर्ता ॲड.मारटकर यांनी मागितलेली माहिती देऊ नये, असे संबंधित विक्रीकर निरीक्षक श्री.डी.के.चन्ने यांनी कळविले होते. त्यामुळे ती नाकारली. मात्र पगारपत्रकाची प्रत देऊ केली असता ॲड.मारटकर यांनी ती स्वीकारली नाही, असे निवेदन जन माहिती अधिकारी श्री.य.गो.महाले व अपिलीय प्राधिकारी श्री.स.मा.भंडारे यांनी केले.

ॲड.मारटकर यांनी मागितलेली माहिती शासकीय सेवकाच्या आर्थिक विवरणाची आहे. ती खाजगी मानता येणार नाही. म्हणून योग्य ते शुल्क आकारून ॲड.मारटकर यांना त्वरित ती माहिती द्यावी. ॲड.मारटकर यांनी अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या कार्यालयात समक्ष जाऊन ती स्वीकारावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार सुनावणीच्या दिवशीच नमुना-१६ च्या चार वर्षांच्या प्रती त्यांना देण्यात आल्या व ऊर्वरित प्रतींसाठी शुल्क भरण्यास त्यांना कळविले, असे अपिलीय प्राधिकारी तथा विक्रीकर सहआयुक्त(व्यवसाय कर), पुणे क्षेत्र, विक्रीकर भवन, तिसरा मजला, येरवडा, पुणे-६ श्री.स.मा.भंडारे यांनी आयोगास अवगत केले. मात्र आपल्याला विहित मुदतीत माहिती दिलेली नसल्यामुळे माहिती निःशुल्क मिळावी व

जन माहिती अधिकाऱ्यांना शास्ती व्हावी, तसेच माहिती आपल्याला कार्यालयात न देता टपालाने पाठवावी, अशी मागणी ॲड.मारटकर यांनी नंतर दि.७.१०.२००९ च्या लेखी निवेदनाद्वारे केली. ॲड.मारटकर कार्यालयात आले होते, परंतु शुल्क भरण्यास नकार देऊन माहिती न देता ते निघून गेले असे अपिलीय प्राधिकारी तथा विक्रीकर सहआयुक्त(व्यवसाय कर), पुणे क्षेत्र, विक्रीकर भवन, तिसरा मजला, येरवडा, पुणे-६ श्री.स.मा.भंडारे यांनी दि.९.१०.२००९ च्या पत्रान्वये आयोगास कळविले. आयोगाने दिलेल्या आदेशानुसार ॲड.मारटकर यांनी माहिती हवी असल्यास शुल्क भरून अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या कार्यालयातून प्राप्त करून घ्यावी. त्रयस्थ पक्ष तरतुदीबाबतच्या अन्वयार्थामुळे माहिती देण्यास विलंब झाला असल्याने शास्तीची मागणी अमान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अंशतः मान्य करून निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३१ .१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. शंकर भगवान काळे
मु.पो.पळसदेव, (काळेवाडी), इंदापूर, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हाधिकारी, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप विभागीय अधिकारी,
अबारामती उपविभाग, बारामती, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७२९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | २७.११.२००८ |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. शंकर भगवान काळे
मु.पो.पळसदेव, (काळेवाडी), इंदापूर, जि. पुणे
**जन माहिती अधिकारी** तथा उप विभागीय अधिकारी,
बारामती उपविभाग, बारामती, जि. पुणे तर्फे प्रतिनिधी श्री. जी.डी. कुंभार

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८.११.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२.१२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१.१.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १३.३.२००७ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

सोबत छायांकित प्रत जोडली आहे.

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ११.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आलेला होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

अपील क्र.७२९/पुणे मध्ये राज्य माहिती आयोगाने दिलेल्या आदेशानंतरही जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, बारामती उपविभाग, बारामती यांनी चुकीची माहिती दिली. मिळालेली माहिती अपूर्ण आहे, या कारणावरून अपीलकर्ता श्री. शंकर भगवान काळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. वडिलांच्या नावे असलेले आदेश व कबुलायती यांच्या प्रती दिल्या. आपण मुलांच्या नावचे हे कागदपत्र मागितले होते, तसेच दिलेल्या चतु:सीमा चुकीच्या आहेत, असे प्रतिपादन श्री. काळे यांनी केले.

संबंधित प्रकरणातील माहिती श्री. काळे यांना देण्यात आली आहे. प्रकरण वडिलांच्या नावाने असल्याने आदेश त्यांच्या नावाने येतात, मुलांच्या नावाने येत नाहीत. वन खात्याच्या जमिनीच्या संदर्भातील या स्वरुपाचे अर्ज व अपिले श्री. काळे यांनी यापूर्वीही केले असून संबंधित संचिका पाहणीसाठी त्यांना देण्यात आली होती व त्यांच्या मागणीनुसार कागदपत्रांच्या प्रती देण्यात आल्या आहेत. आयोगाने दि.११.६.२००८ रोजी दिलेल्या आदेशानुसार नकला देण्याबाबत मूळ प्रकरण तहसीलदार, इंदापूर यांच्या कार्यालयाकडे नसल्याचे त्यांना कळविण्यात आले होते. आदेश, कबुलायती व चतु:सिमा याच्या नकला त्यांना देण्यात आल्या असून ताबे पावती मूळ प्रकरणात आढळून येत नसल्यामुळे देता येत नसल्याचे त्यांना कळविण्यात आले, असे प्रतिपादन तकात्लीन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, बारामती उपविभाग, श्री. नंदकुमार काटकर व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. विजयसिंह देशमुख यांनी केले. मूळ प्रकरणातील अभिलेख अपीलकर्त्यास दाखवून सर्व कागदपत्रे देण्यात आली आहेत, असे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसते. मूळ प्रकरणातच नसलेली कागदपत्रे देता येत नसल्याबाबतचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिपादन रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**( विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २०.१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.पोपट साधू कोलते
प्रवरा ७, पुण्याईनगर, धनकवडी,
पुणे- ४११ ०४३ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
पुरंदर तहसील कार्यालय,
ता.पुरंदर, जि. पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी तहसीलदार,
पुरंदर तहसील कार्यालय,
ता.पुरंदर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७३१ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.११.२००८ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,<br>पुरंदर तहसील कार्यालय,<br>ता.पुरंदर, जि. पुणे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा निवासी तहसीलदार,<br>पुरंदर तहसील कार्यालय,<br>ता.पुरंदर, जि. पुणे | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१३.०२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२३.०२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१४.१२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१७.०४.२००७ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -**<br>गुऱ्होळी, ता.पुरंदर येथील श्री.भरत दशरथ खेडेकर यांच्या जमिनीवर चढविण्यात आलेल्या बोजाच्या आदेशाची प्रत व इतर माहिती |
|---|---|

## विवेचन

श्री.भरत दशरथ खेडेकर यांच्या जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर बँकेचा बोजा कसा आला याची माहिती मिळाली नाही, म्हणून अपीलकर्ता श्री. पोपट साधू कोलते यांनी अपील केले आहे.

संबंधित संचिका उपविभागीय अधिकारी भोर, जि.पुणे यांच्याकडे पाठविण्यात आली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, पुरंदर तहसील कार्यालय, ता.पुरंदर,जि.पुणे यांनी श्री.कोलते यांना कळविले व अर्ज उपविभागीय अधिकाऱ्यांकडे वर्ग केला. अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, पुरंदर तहसील कार्यालय, ता.पुरंदर,जि.पुणे यांनी अपिलाचा एकतर्फी निर्णय देऊन जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर कायम ठेवले. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार यांनी ५ दिवसांत अर्ज वर्ग करणे आवश्यक होते त्याऐवजी १० दिवसांनी अर्ज वर्ग केला. ज्या शेतकऱ्याने कर्ज काढलेले नाही. तो जामीनदार नाही, कोणतेही करारपत्र नाही, अशा शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यावर विशेष वसुली अधिकारी व मंडल अधिकारी यांनी खोट्या नोंदी करण्याबाबात कारवाई करणे अपेक्षित होते. परंतु त्याऐवजी खोटी व दिशाभूल करणारी माहिती देण्यात आली. कोणत्या कायद्यान्वये व कलमान्वये महसूल खात्याने बोजांची नोंद केली ती माहिती द्यावी, असे प्रतिपादन श्री.कोलते यांनी केले.

पुरंदर नागरी सहकारी पतसंस्था या संस्थेच्या वसुली अधिकाऱ्यांनी गाव कामगार तलाठी यांना दिलेल्या आदेशानुसार नोंद करण्यात आल्याचे श्री.कोलते यांना संबंधित पत्राच्या प्रतीसह दि.०१.०२.२००८ रोजी कळविण्यात आले, असे उपविभागीय अधिकारी भोर उपविभाग, पुणे यांनी दि.०१.०२.२००८ रोजीच्या अहवालान्वये आयोगास कळविले. संबंधित प्रती व कायद्याच्या कलमाची प्रत श्री.कोलते यांना पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार पूर्तता केल्याचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, पुरंदर तहसील

कार्यालय, ता.पुरंदर,जि.पुणे श्री. सुनिल चंदनशिवे यांनी दि.२८.११.२००८ च्या पत्रान्वये आयोगास सादर केला.

जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, पुरंदर तहसील कार्यालय, ता.पुरंदर,जि.पुणे यांनी श्री.कोलते यांचा अर्ज ५ दिवसात उपविभागीय अधिकाऱ्यांमध्ये वर्ग करावयास हवा होता. या बाबत दक्षता घेण्याची समज त्यांना देण्यात येत आहे.

केलेल्या नोंदीची कायदेशीर योग्यायोग्यता व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दिनांक : १४ / १०/२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री.अरुण पंढरीनाथ साळुंके
द्वारा श्री.एन.एस.बिडवाई,
गजानन नगर, स.नं.५४, नवीसांगवी, पुणे-२७ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** शिक्षण संचालक,
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१ उत्तरवादी
**जन माहिती अधिकारी तथा** प्रशासन अधिकारी,
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७३३/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.०१.१०.२००९ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** शिक्षण संचालक,<br>माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय,<br>महाराष्ट्र राज्य, पुणे-१ डॉ.एस.जी.खतीब<br>**जन माहिती अधिकारी तथा** प्रशासन अधिकारी,<br>माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय,<br>महाराष्ट्र राज्य, पुणे-१ श्री.स.शं.शिंदे | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.११.१२.२००६ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१६.१२.२००६ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.३१.०१.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>कार्यालयीन जावक क्र./अमाशा/३४०५/०९/६३०९४/१४ क, दि.०२.०८.२००५ चे पत्रावर केलेल्या कार्यवाहीचा तपशील, विद्यालयातील नियमबाह्य शिक्षक, शिक्षकेतरांना बेकायदेशीरपणे वेतन अदा करण्यात येत आहे. या संदर्भात शासनाकडून प्राप्त झालेल्या आदेशांची साक्षांकित प्रत इ.अनुषंगिक मुद्दे | |

## विवेचन

शाळा न्यायाधिकरणाच्या निकालानुसार केलेल्या कारवाईच्या अनुषंगाने अपीलकर्ता श्री.अरुण पंढरीनाथ साळुंके यांनी जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे माहिती मागितली होती. ती न मिळाल्याच्या कारणावरुन, त्यांनी प्रथम अपील न करता राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दि.१२.६.२००८ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त अपीलकर्ता गैरहजर होते. उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपील सुनावणीसाठी घेण्यात आले.

श्री.साळुंके यांनी मुख्यत: स्वत:ची वैयक्तिक मान्यता, थकीत वेतन आदीबाबतची कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. त्यांच्या अर्जातील मुद्दे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत 'माहिती'च्या व्याख्येत येत नाही. उदा.न्यायालयीन आदेश डावलून नियमबाह्य व्यक्तिंना मान्यता देऊन वेतन हडप करण्यासाठी असणारी कायद्यातील तरतुदीची साक्षांकित प्रत उपलब्ध करुन द्यावी. त्यांचा मूळ अर्ज माध्यमिक व उच्च माध्यमिक, शिक्षण संचालनालयाकडे प्राप्त झालेला नाही. आयोगाने विचारणा केल्यानंतर संचालनालयाने संबंधित कागदपत्रांच्या प्रती समक्ष येऊन घेण्याबद्दल त्यांना कळविले, त्यानुसार सर्व संचिका त्यांना दाखविण्यात आल्या व त्यांना हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती दि.१.४.२००८ रोजी त्यांना देण्यात आल्या, असे जन माहिती अधिकारी श्री.स.शं.शिंदे यांनी लेखी व तोंडी नमूद केले. श्री.साळुंके यांची तशी पोहोच असल्याची छायांकित प्रत त्यांनी सादर केली. अपीलकर्त्यानेही आयोगाला तसे पत्र दिले असल्याचे अपीलकर्त्याने कळविल्याचे त्यांनी नमूद केले.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ५ .१०.२००९